भुमिसंपादन, पुनवर्सन व पूनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क- अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम २१ खंड (१)व (२) ची नोटीस

जा.क्र. विभूसंघ/विघऔ/भुसं/४/९६/क 1204
विशेष भूसंपादन अधिकरी,
महानगरपालिकेची,प्रशासकीय
इमारत टप्पा क्र.३ पहिलामजल्यावरील
दक्षिणेकडील दालन,
दि. १०/०४/२०१९

## जाहिर नोटीस

**प्रकरण :- भुसंपादन -औरंगाबाद**

वाळुज अधिसुचित क्षेत्राच्या नियोजित विकासासाठी व उपयोगा करीता भुसंपादन करण्यासाठी गट २२ व २३ मौजे गोलवाडी ता.जि.औरंगाबाद या शिवरातील काही जमिनीचे क्षेत्र संपादन करणे कामी भुमीसंपादन,पुनवर्सन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३/(२०१३ चा ३०) च्या कलम २१ खंड (१) व (२) ची जाहिर प्रकटनाची नोटीस प्रसिध्द करणे बाबत.

मा. जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी महाराष्ट्र, प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १२६ पोटकलम (४) सह भुमिसंपादन, पुनवर्सन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शतेचा हक्क अधिनियम -२०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम १९ अन्वये काढलेली अधिसुचना क्र.२०१८/आरबीडेस्क/एलएक्यू/समन्वय/भुसं/४/९६(क)/CR-३७ दि.२०/०३/२०१८ ही महाराष्ट्र शासनाचे राजपत्र भाग-१,औरंगाबाद दि.२९/०३/२०१८ तसेच दैनिक सहयाद्री टाईम्स दि.२७/०३/२०१८ व दैनिक आनंद नगरी दि.२७/०३/२०१८ या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली असुन त्यासोबतच्या अनुसुचित दर्शविल्याप्रमाणे जमिनी,मालमत्ता वरील सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्यात येऊन ताबा घेण्यात येणार आहे.

अनुसूची- एक
संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नाव - गोलवाडी, तालुका- औरंगाबाद, जिल्हा -औरंगाबाद

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १ | २२ पैकी | २.६० |
| २ | २३ पैकी | २.२३ |

सदर जमिन,मालमत्ते मध्ये ज्यांचे हितसंबंध असतील त्यांना हितसंबंधाचे स्वरुप,हितसंबंधाबाबतच्या नुकसान भरपाईची मागणी स्वरुपात व संपादित करण्यात येत असलेल्या क्षेत्रफळाबाबत त्यांना काही हरकत असल्यास तशी हरकत इ. तपशिल या कार्यालयास स्वत:किंवा प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी मार्फत नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन किमान ३० दिवस व जास्तीत जास्त ६ महीन्याच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर राहून आपले निवेदन प्रत्यक्ष सांगावे व लेखी सादर करावे.

विशेष भूसंपादन अधिकारी,
विशेष घटक, औरंगाबाद